नियमित दिवाणी दावा १८/२०२२
शलमोहन डेव्हीड काळे वि. सुनिल शामराव गायकवाड
नि.नं. २१ /लगत / सी

**<u>वादी तर्फे श्री.सी. व्ही. माजगावकर वकील यांच्या मार्फत उलटतपास पुन्हा शपथेवर सुरु,</u>**

१७.(साक्षीदारास नि. २५ वरील कागदपत्र दाखविण्यात आले.)हे म्हणणे खरे आहे की, आता मला दाखविण्यात आलेल्या नि. २५ वरील कागदपत्रामध्ये सुमित्र कृष्णाजी काळे यांची ए. कु. पु अशी नोंद आहे. सदरची नोंद ही जुना सर्वे नं. १८०/१९–अ संदर्भात आहे किंवा कसे हे मला सांगता येणार नाही. सदर नोंदीला गट क्र. ६७६ केव्हा पडला हे मला सांगता येणार नाही. सुमित्र काळे हे वादी यांचे चुलत चुलते आहेत किंवा कसे याविषयी मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे नाही की, जुना सर्वे क्र. १८०/१९–अ व गट क्र. ६७६ ही सामाईक मिळकत आहे. हे म्हणणे खरे नाही की, सुमित्र काळे एकत्र कुटुंब प्रमुख असताना त्यातील १२ गुंठे जमीन त्यांनी वादीच्या वडिलांना विकली. हे म्हणणे खरे आहे की, सदरची जमीन हे वादीच्या वडिलांनी २००६ मध्ये मला विकली होती. हे म्हणणे खरे नाही की, सदरची जमीन ही वादीच्या आजोबांची होती. हे म्हणणे खरे नाही की, सदरची जमीन ही वादी यांची वडिलार्जित जमीन आहे. हे म्हणणे खरे नाही की, वादीच्या वडिलांनी सन २००६ मध्ये त्यांच्या इतर वारसांची परवानगी न घेता मला जमीन विकली. हे म्हणणे खरे नाही की, वादीच्या वडिलांना सदरची १२ गुंठे जमीन विकण्याचा कोणताही अधिकार नव्हता. हे म्हणणे खरे नाही की, वादीच्या वडिलांना त्यांना असलेल्या १/५ एवढाचा हिस्सा विकण्याचा त्यांना अधिकार होता. हे म्हणणे खरे नाही की, वादीच्या वडिलांनी त्यांचा तसेच त्यांच्या दोन मुली, दोन मुलगे असा हिस्सा मिळून १२ गुंठे जमीन मला विकली होती. हे म्हणणे खरे नाही की, वादीच्या वडिलांची प्रस्तुत दावा मिळकत ही स्वकष्टार्जित मिळकत आहे. हे म्हणणे खरे आहे की, मला वादीच्या वडिलांनी जमीन विकली तेव्हा सर्व वादी हे सज्ञान होते. हे म्हणणे खरे नाही की, सदर जमीन मला विकतेवेळी सर्व वादी सज्ञान असल्यामुळे त्यांची संमती घेणे आवश्यक होते. हे म्हणणे खरे नाही की, सदर सर्व वादींची जमीन देण्याबाबतची संमती मी घेतलेली नाही. हे म्हणणे खरे नाही की, वादी यांचा हक्क डावलून सदरचे खरेदीपत्र मी केलेले आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी केलेल्या खरेदीपत्रामुळे वादीच्या हक्कांचे नुकसान झालेले आहे. हे म्हणणे खरे आहे की, वादी यांच्या वंशावळीविषयी मला माहिती नाही.

१८. मी वादीच्या वडिलांना ओळखतो. मी वादीच्या वडिलांचे वडील लक्ष्मण यांना ओळखत नाही. मी विकत घेतलेली मिळकत विभाजत मिळकत होती किंवा कसे याविषयी मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी विकत घेतलेल्या मिळकतीची वाटणी झालेली नाही याची माहिती मी करून घेतलेली नाही. हे म्हणणे खरे नाही की, वादीच्या हक्काची अविभाजित न झालेली मिळकत मी विकत घेतलेली आहे. सदर दावा मिळकतीचे जुन्या सर्वे क्रमांकापूर्वी वाटप झाले होते किंवा कसे याबाबत मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे आहे की, याच न्यायालयात वादी याने वाटपाकरिता दिवाणी मुकदमा क्र. १२९/२०२२ हा दावा दाखल केलेला आहे.

१९.हे म्हणणे खरे नाही की, दावा मिळकतीच्या कोणत्याही वारसांची परवानगी घेतलेली नसल्यामुळे मी केलेले खरेदीपत्र हे बेकायदेशीर आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी दावा मिळकतीत करीत असलेला कब्जा हा देखील बेकायदेशीर आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी केलेल्या खरेदी दस्तामुळे वादींच्या हक्कांचे उल्लंघन झालेले आहे. हे म्हणणे खरे नाही की, आजरोजी वादी यांना दावा मिळकतीपासून वंचित करण्यासाठी मी आजरोजी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पुर्ण.**

**फेरतपास नाही.**

श्रवणोत्तर स्वीकृत,

**सही/-**

दि. १८/१२/२०२५.

**( के. दि. काकतकर )**

सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर, पन्हाळा